# University of Mumbai

अतिशय महत्वाचे
परीक्षा विभाग,
मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी,
मुंबई - ४०० ०९८.

क्र./परीक्षा/विज्ञान/आसनव्यवस्था/ ५०८ /२०१३

परिपत्रक :-

मुंबई विद्यापीठाच्या विविध विभागांचे संचालक/प्रमुख, संलग्नीत महाविद्यालयाचे प्राचार्य, मान्यता प्राप्त संस्थांचे संचालक/प्रमुख व प्राध्यापक-नि संचालक, दुर व मुक्त अध्ययन संस्था यांना असे कळविण्यात येते की, दि. ९ जुलै, २०१३ रोजी मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाच्या संपन्न झालेल्या बैठकीतील मंजूर करण्यात आलेल्या ठरावानुसार द्वितीय सत्र-२०१३ च्या परीक्षांपासून जास्त विद्यार्थी संख्या असलेल्या विद्यापीठ परिक्षेसाठी प्रत्येक महाविद्यालयाला परीक्षा केंद्र देण्याच्या निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार शक्यतो प्रत्येक महाविद्यालयास मोठया परीक्षांचे परीक्षा केंद्र देण्यात येणार आहे. तसेच यापुढे प्रत्येक महाविद्यालयाच्या केंद्रावर त्या महाविद्यालयात विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांसाठी नोंदणी केलेल्या एकुण विद्यार्थी संख्येच्या दीडपटीपर्यंत विद्यार्थीसंख्या परीक्षेसाठी देण्यात येणार आहे. या विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याची पूर्ण व्यवस्था करण्याची जबाबदारी परीक्षा केंद्र असलेल्या महाविद्यालय व्यवस्थापनावर राहील.

तसेच पुढे आपणांस असेही कळविण्यात येत आहे की, द्वितीय सत्र-२०१३ च्या परीक्षांपासून परीक्षांची आसन व्यवस्था विद्यापीठाच्या www.mu.ac.in या संकेतस्थळावर वर उपलब्ध करुन देण्यात येईल. आसन व्यवस्थेची हार्ड कॉपी पाठविण्यात येणार नाही. तरी सर्व महाविद्यालयांनी सदर आसनव्यवस्था संकेतस्थळावरुन वेळेत डाऊनलोड करुन घेऊन विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन द्यावी ही विनंती.

Padma Deshmukh

मुंबई – ४०००९८
दि. २८ ऑगस्ट, २०१३

डॉ. पदमा वि. देशमुख
परीक्षा नियंत्रक